admn 25-26

२८३

MCAER
कृषि परिषद

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.
ई मेल- mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८
संकेतस्थळ- www.mcaer.org

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/ ४९२५/२६/१३३ दि.१३ जानेवारी,२०२६

## परिपत्रक

**विषयः-** **आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया २०२५-२६**
**तिसरी प्रवेश फेरी कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी वेगवेगळया दिनांकास राबविणेबाबत.**

सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षातील आचार्य पदवी अभ्यासक्रमाची तिसरी प्रवेश फेरी नियोजित वेळापत्रकानुसार दि.१९ व २० जानेवारी,२०२६ रोजी चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी आयोजित करण्यात आलेली आहे. तथापि, या कार्यपध्दतीमुळे रिक्त असलेल्या सर्व जागांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रविष्ठ होण्यापासून काही उमेदवार वंचित राहतात.

प्रत्येक कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशास पात्र असलेल्या प्रत्येक उमेदवारास प्रविष्ठ होणे शक्य व्हावे, या दृष्टिकोनातून एकाच कालावधीमध्ये चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी तिसरी प्रवेश फेरी आयोजित न करता, प्रत्येक कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी स्वतंत्र दिनांकास संबंधित कृषी विद्यापीठांतर्गत रिक्त जागांवर तिसरी प्रवेश फेरी खालीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे.

| कृषी विद्यापीठाचे नाव | प्रवेश फेरीचा दिनांक |
|---|---|
| डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | दि. १९/०१/२०२६ |
| महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहिल्यानगर | दि. २१/०१/२०२६ |
| वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | दि. २३/०१/२०२६ |
| डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | दि. २७/०१/२०२६ |

आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, उक्त दिनांकास शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील कार्यपध्दतीनुसार उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात येतील.

प्रवेशाचे वाटप करण्याची कार्यपध्दती आचार्य पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०२५-२६ मधील 'परिशिष्ट जे' मध्ये नमूद केल्याप्रमाणे अवलंबिण्यात येईल. याची सर्व प्रवेशोच्छुक व पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने.**

**(यशवंत साळे)**
**संचालक (शिक्षण)**

प्रत कार्यवाहीसाठीः-

१) कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

२) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३) मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रकास अनुसरून तिसऱ्या प्रवेश फेरीची प्रक्रिया करावी. तसेच संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध असलेल्या जागांचा तपशील अद्ययावत करावा. सदर परिपत्रकाबाबंत गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना ई-मेल / भ्रमणध्वनी संदेशाद्वारे अवगत करावे.